## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपी लोकसेवक** श्री जितेंद्र शालीग्राम बेहरे, वय ४९ वर्ष, पद उपअधिक्षक, भुमीअभिलेख वर्ग–२, भुमीअभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा, ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा, मुळ रा. श्रद्धा सोसायटी, घर क. ८, नकाने रोड, धुळे ता.जि. धुळे ह.मु. तांबेकर यांचे घर, मेहकर रोड, सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा |
| लाच मागणी | लाचमागणी ६०००/– रुपये<br>तडजोडीअंती ५०००/– रुपये |
| लाच स्विकारले | ५०००/– रुपये |
| घटनास्थळ | उपअधिक्षक भुमी अभिलेख सिंदखेडराजा यांचे दालन, भुमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि.बुलडाणा |
| घटना तारीख | ११.०५.२०२३ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांचे आजोबा यांचे नावावर असलेला सिंदखेडराजा गावठाणमधील प्लॉट चे मिळकत पत्रीकेवर तक्रारदार यांचे वडील व चुलत भाउ यांचे वारसाहक्काने नोंद घेण्यासाठी यातील आलोसे श्री. जितेंद्र बेहरे उपअधिक्षक, भुमीअभिलेख वर्ग–२, भुमीअभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा, ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा यांनी तक्रारदार यांचेकडे ६०००/– रुपये लाच मागणी केल्याने तक्रारदार यांनी लेखी तक्रार लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा यांचेकडे दिनांक ११/०५/२०२३ रोजी तक्रार दिली होती.

त्यानुसार आज दिनांक ११/०५/२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. जितेंद्र बेहरे उपअधिक्षक, भुमीअभिलेख वर्ग–२ यांनी तक्रारदार यांना पंच क्र १ यांचे समक्ष ६०००/– रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती ५०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार सदर प्रकरणात आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान ५०००/– रुपये पंच क्र. १ यांचे समक्ष स्विकारली. त्यावरुन आरोपी श्री. जितेंद्र बेहरे यांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सिंदखेडराजा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. मारोती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
४. मा. श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. बुलढाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक,अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा, पोहेकॉ/राजेंद्र क्षीरसागर, पोना/जगदीश पवार, पोकॉ/अजहर काझी, मपोकॉ/स्वाती वाणी, चालक नापोकॉ. नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२–२४२५४८ व ८४४६५२००२० तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे.

( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो, बुलडाणा

Scanned with CamScanner